सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://www.dte.maharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

परिपत्रक क्रमांक : १०/एडीएम/उन्हाळी सुट्टी २०२३-२४/ १६२ दिनांक : 16 APR 2024

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील उन्हाळी सुट्टी बाबत....**

संदर्भ : १. शैक्षणिक वेळापत्रक क्र.MSBTE/D-४०/Academic Calendar/२०२३/३३२, दि.२२.०६.२०२३.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.मरातंशिमं/का-५१/उन्हाळी सुट्टी/२०२४/२२०१, दि.०२/०४/२०२४.

राज्यातील संचालनालयांतर्गत सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदान तत्वावर चालणारी तंत्रनिकेतने व इतर पदविका संस्थांमधील (स्वायत्त तंत्रनिकेतनांव्यतिरिक्त इतर) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये २० दिवस हिवाळी व ४० दिवस उन्हाळी सुट्टी देण्यात येते.

त्याअनुषंगाने सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांच्या संस्थेतील जे कर्मचारी (व्हॅकेशनल स्टाफ) सुट्टीस पात्र आहेत, त्यांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी संदर्भाधीन पत्रांन्वये प्रस्तावित केल्यानुसार निवडणूक/परीक्षेच्या कामासाठी, मंडळस्तरावरील कामकाज व शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील राज्य सामाईक प्रवेश परिक्षा तसेच पदविका / पदवी प्रवेश प्रक्रिया या कामासाठी लागणारा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग थोपवून **दिनांक २२ एप्रिल, २०२४ ते दिनांक ३१ मे, २०२४ उन्हाळी सुट्टी** देण्यात यावी.

तथापि सर्व सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांची उन्हाळी परीक्षा २०२४ करीता महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने वेळोवेळी घोषित केलेल्या सूचनांनुसार काम करणे आवश्यक आहे. परीक्षा सुरळीतपणे व विहित कालावधीमध्ये पार पडेल याची दक्षता घेऊन आवश्यक ती कार्यवाही करणे गरजेचे आहे. संचालनालयामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील राज्य सामाईक प्रवेश प्रक्रिया व प्रवेश प्रक्रियेच्या महत्वाच्या कामासाठी संस्थास्तरावर मनुष्यबळ उपलब्ध असणे आवश्यक आहे. परीक्षा तसेच प्रवेशप्रक्रिया सुरळितपणे पार पाडण्याची जवाबदारी सर्वस्वी संस्थेच्या प्राचार्यांची राहील. तातडीच्या व महत्वाच्या कामासाठी ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना थोपविण्यात येईल त्यांनी उपरोक्त नमूद कामे सुरळीत पार पाडतील व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच त्यांना पुढे असेही कळविण्यात येते की, संबंधित अधिकारी/कर्मचारी वर्गाकडून परीक्षेच्या कामामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई वा कामचुकारपणा दिसून आल्यास त्यांच्यावर नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

तसेच ज्या संस्थांना शैक्षणिक स्वायत्तता दिलेली आहे, त्या संस्थांना त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा कालावधी व परीक्षेचा कालावधी यांचा विचार करुन तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांच्या कामासाठी व शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील राज्य सामाईक प्रवेश प्रक्रिया व प्रवेश प्रक्रियेच्या कामासाठी लागणारा अधिकारी/कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिला जाईल, या अटीवर त्यांच्या सोईनुसार उन्हाळा सुट्टी जाहिर करण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापी सदर सुट्टी ४० दिवसांपेक्षा जास्त असू नये.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :

१) प्राचार्य, शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित तंत्रनिकेतने/ इतर तत्सम पदविका संस्था (विभागीय कार्यालयामार्फत)
२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा (पु.), मुंबई-५१.
३) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजी नगर/अमरावती/नागपूर.
४) उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/ छत्रपती संभाजी नगर /नागपूर.
५) कार्यासन क्रमांक २, ४, ४अ, १२, मुख्य कार्यालय, मुंबई.
६) का.क्र.३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

D:\nutan\vacation sum win\Cir Vaca summer 23 24.docx